माहिती हवीय?

अशोक वा. कोर्टीकर, पंढरपूर.

□ 'सौ बार जनम लेंगे, हम तुम ना जुदा होंगे...' व 'राधिके तुने बंसरी चुराई...' ही गाणी कोणत्या चित्रपटातील? नायक-नायिका कोण?

– पहिलं गाणं *उस्तादों के उस्ताद* या चित्रपटातील. नायक-नायिकाः प्रदीपकुमार, शकीला, दुसरे गाणे *बेटीबेटे* या चित्रपटातील. नायक-नायिकाः सुनील दत्त-बी. सरोजादेवी.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ अनेक चित्रपट पूर्ण होऊन पडद्यावर येत नाहीत. डब्यात जातात हे चित्रपट टीव्हीवर दाखवण्याचा अधिकार निर्मात्याला असतो काय?

– असतो. बुडत्याला काडीचा आधार त्याप्रमाणे या चित्रपटांना टीव्हीचा आधार असतो.

मारुती गणपत कोळी, नवघर कोळीवाडा.

□ *त्रिशुल*मध्ये पूनम धिल्लाँचा नायक कोण होता?

– सचिन.

ज्ञानेश्वर महाडीक, महाड.

□ पूनम धिल्लाँने राजेश खन्ना व मिथुन चक्रवर्ती यांच्याबरोबर कोणकोणत्या चित्रपटात नायिकेची भूमिका केली?

– *रेड रोज, दर्द* या चित्रपटात राजेश खन्नाबरोबर. *मैं और मेरा हाथी, बादल, बेपनाह, अविनाश, हिसाब खून का, झुठी शान* या चित्रपटात मिथुनबरोबर.

अनिकेत मारुती कोळी, नवघर कोळीवाडा.

□ मधुबाला व किशोरकुमार यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *ढाके की मलमल, चलती का नाम गाडी, महलों के ख्वाब, झूमा, हाफ टिकट.*

□ किशोरकुमारचा पहिला हिट चित्रपट कोणता?

– *लडकी.*

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

□ दिलीपकुमार व राजकुमार यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?

– *पैगाम, सौदागर.*

□ वसंत देसाईंनी संगीतबद्ध केलेले हिंदी व मराठी चित्रपट कोणते?

हिंदी चित्रपटः *शोभा, आँख की शर्म, मौज, शकुंतला, पर्वत पे अपना डेरा, जीवनयात्रा, सुभद्रा, अंधो की दुनिया, मतवाला शायर, रामजोशी, मंदिर, सोना, नरसिंह अवतार, उद्धार, दहेज, हिंदुस्तान हमारा, शीश महल, जीवनतारा, हैदराबाद की नाजनीन, आनंद भवन, धून, झांसी की रानी, झनक झनक पायल बाजे, तुफान और दिया, दो आँखे बारह हाथ, मौसी, दो फूल, अर्धांगिनी, दो बहने, गुंज उठी शहनाई, सम्राट पृथ्वीराज चौहान, स्कूल मास्टर, प्यार की प्यास, संपूर्ण रामायण, राहुल, चांद, अमरज्योती, भरत मिलाप, लडकी सह्याद्री की, रामराज्य, आशीर्वाद, गुड्डी, अचानक, ग्रहण, जय राधेकृष्ण.*

मराठी चित्रपटः *लोकशाहीर रामजोशी, क्रांतिवीर वासुदेव बळवंत, अमर भूपाळी, ही माझी लक्ष्मी, श्यामची आई, माझी जमीन, कांचनगंगा, बाप माझा ब्रह्मचारी, छोटा जवान, मोलकरीण, स्वयंवर झाले सीतेचे, इये मराठीचिये नगरी, धन्य ते संताजी धनाजी, बायांनो नवरे सांभाळा, राजा शिवछत्रपती.*

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम कॉजवे, मुंबई.

देवेंद्र म. आंबुकर, वरळी, मुंबई.

□ अनिल कपूर व जूही चावला यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केली?



झुठ बोले कौवा काटेमध्ये अनिल - जूही

– *अंदाज, बेनाम बादशहा, दीवाना मस्ताना, झुठ बोले कौवा काटे.*

□ रफी व लता यांनी गायलेलं 'दोस्त बन के आये हो...' हे गाणं कोणत्या चित्रपटातील? कलाकार, गीतकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण?

– चित्रपटः *बिन फेरे हम तेरे*. कलाकारः आशा पारेख, विनोद मेहरा, सारिका, नाजनीन, नादिरा, राजेंद्रकुमार, जानकीदास. गीतकारः असद भूपाली, निर्माताः एन. टी. सिंह, दिग्दर्शकः रजत रक्षित.

पी. एस. म्हापसेकर, म्हापसा गोवा.

□ जॉय मुखर्जीची पत्नी अभिनेत्री आहे का? त्याच्या मुलांनी चित्रपटात भूमिका केलीय काय?

– जॉय मुखर्जीची पत्नी नीलम हिचा अभिनयाशी काही संबंध नाही. त्याचा मुलगा बॉब मुखर्जी याने माला सिन्हाची मुलगी प्रतिभा सिन्हा हिच्याबरोबर *हीर रांझा*वरील एका चित्रपटात नायकाची भूमिका केली होती.

सोनाली काळे, मुंबई.

□ चित्रपटात नायक असूनही दिग्दर्शक झालेले कलाकार कोण?

– अनेक आहेत. पैकी नावं घ्यायची झाली तर काही ठळक उदाहरणं देता येतील ती अशी- व्ही. शांताराम, राज कपूर, मनोजकुमार, किशोरकुमार, दादा कोंडके, कमल हासन, राकेश रोशन, फिरोज खान, संजय खान, सचिन, महेश कोठारे, मेहमूद, असरानी, जगदीप, गुरु दत्त, सुनील दत्त.

अनिल राणे, उमरगाव.

□ किशोरकुमार आणि लता मंगेशकरने एकत्र गायलेलं पहिलं चित्रपटगीत कोणतं? चित्रपट कोणता? कलाकार कोणते?

– १९४८च्या बॉम्बे टॉकीजच्या *जिद्दी* या चित्रपटात किशोरकुमार-लता मंगेशकरने सर्वप्रथम एकत्र पार्श्वगायन केलं. या चित्रपटात देव आनंद आणि कामिनी कौशल मुख्य कलाकार होते.

संजय बनसोडे, कुलाबा.

□ अमिताभ बच्चन आणि अमजद खान यांनी कोणकोणत्या चित्रपटात एकत्र भूमिका केल्या?

– अमिताभ बच्चन आणि अमजद खान यांनी *शोले, परवरीश, बेशरम, मुकद्दर का सिकंदर, मि. नटवरलाल, सुहाग, राम बलराम, बरसात की एक रात, कालिया, लावारिस, याराना* या चित्रपटात भूमिका केल्या आहेत. ●